केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजना
(Integrated Power Development Scheme)
महाराष्ट्र राज्यात सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक :एवियो-२०१५/प्र.क्र.१९७/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना :-

शहरी भागातील वाढती ग्राहक संख्या, आधुनिक जीवनशैलीमुळे वीजेचा वाढता वापर यामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या वीज वितरण प्रणालीचे विस्तारीकरण व बळकटीकरण करणे आवश्यक असल्याने शहरी भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याकरीता केंद्र शासनाने एकात्मिक ऊर्जा विकास योजना (Integrated Power Development Scheme) सर्व राज्यांकरीता सुरु केली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्यात महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येणार आहे. ही योजना महाराष्ट्रात राबविण्याकरिता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा प्रस्ताव दि. १९ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता त्यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजना (Integrated Power Development Scheme) महाराष्ट्र राज्यात खालीलप्रमाणे सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे.

एकात्मिक ऊर्जा विकास योजनेची उद्दिष्टे :-

अ) शहरी भागातील वीज ग्राहकांना २४ X ७ वीज पुरवठा करणे.

ब) शहरी भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, श्रेणीवर्धन, बळकटीकरण करणे, वीज वितरण प्रणालीतील वीज हानीचे योग्य मोजमाप करण्यासाठी ऊर्जा अंकेक्षण (Energy Audit) महत्वाचे असल्याने यासाठी ग्राहकांकडील तसेच वीज वितरण रोहित्र व फिडर यावर योग्य क्षमतेचे मीटर लावणे.

क) शहरी भागातील घरगुती, वाणिज्य व औद्योगिक ग्राहकांसाठी वीज जोडण्या देण्यासाठी लागणारी यंत्रणा उभारणे.

ड) शहरी भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण/आधुनिकीकरण करणे.

२. सदर योजनेकरीता केंद्र शासनाकडून मंजूर प्रकल्प खर्चाच्या ६०% रक्कम अनुदान स्वरुपात मिळणार असून, प्रकल्प खर्चाच्या १०% रक्कम महावितरण कंपनीने उपलब्ध करुन द्यावयाची आहे. उरलेली ३०% रक्कम वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात घ्यावयाची आहे. तसेच केंद्र शासनाने नमूद केलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण केल्यास अतिरिक्त १५% पर्यंत वाढीव अनुदान (एकूण कर्ज रक्कमेच्या ५०%) केंद्र शासनाकडून मिळणार आहे.

३. केंद्र शासनाने एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत देशपातळीवर रु. ३२६१२ कोटींची तरतूद केलेली आहे. या योजनेसाठी पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (PFC)यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

४. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील ३५ जिल्ह्यांकरिता एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत रु. २३००.४३ कोटी इतक्या रक्कमेचे ४५ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) जिल्हा विद्युत समिती सदस्यांबरोबर विचारविनिमय करुन तसेच तांत्रिकदृष्या व आर्थिकदृष्या आवश्यक व्यवहार्यता तपासून तयार करण्यात आले आहेत व त्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे.

५. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील	संख्या
१	वीज प्रणाली सक्षमीकरण	एकूण प्रस्तावित शहरे - २५५
२	मीटर प्रणाली	
३	सौर प्रकल्प उभारणे	

६. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सूचित केल्यानुसार दि.२/६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हानिहाय “जिल्हा विद्युत समिती” (District Electricity Committee) जिल्हयातील ज्येष्ठ खासदाराच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. सदर योजनेचे डीपीआर बनविताना सदर समितीशी विचार विनिमय करण्यात येईल व योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येतील.

७. सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र शासन, मे.पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) व महावितरण यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. सदर योजनेच्या अनुषंगाने तसेच महावितरण व महापारेषण कंपनीच्या माध्यमातून सर्व राज्य व केंद्रस्तरीय योजनांतर्गत विद्युत पायाभूत सुविधा व उपकेंद्राकरीता, राज्यातील शहर व ग्रामीण क्षेत्रात शासकीय जागा नाममात्र शुल्कात उपलब्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यास तसेच जेवढा निधी सदर शासकीय जागेकरिता भरावा लागणार आहे, त्याऐवजी तेवढया निधीतून विद्युत पायाभूत सुविधा त्या शहरात वा त्या जिल्हयात वाढवून देण्याच्या अटीवर, शासकीय जमिनी दीर्घ कालावधीसाठी नाममात्र भाडेपट्टयाने संबंधीत कंपनीस उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. वरील योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल जिल्हा विद्युत समिती समोर ठेवण्यात यावा तसेच शासनास सादर करण्यात यावा.

१०. हा शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ०१/२०१६, दिनांक ८ जानेवारी, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०१२८१७३७२५३७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallapa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallapa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Bhimashankar Yallapa Manta
Date: 2016.01.28 17:39:05 +05'30'

(भि.य.मंता)
शासनाचे उपसचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री(ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) सर्व लोकसभा व राज्यसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
५) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधानभवन, मुंबई.
६) सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य , महाराष्ट्र राज्य
७) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
८) सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा.अध्यक्ष / सभापती, जिल्हा पंचायत समिती
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा)महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ०२०
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१२) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप/रालेवि-१), मुंबई
१३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१४) निवासी लेखाधिकारी, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

१८)सर्व विभागीय आयुक्त
१९) सर्व जिल्हाधिकारी
२०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१) नियोजन विभाग (१४६१),मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२२) वित्त विभाग (अर्थसं/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२३) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२४) कक्ष अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२५) सर्व कार्यासने (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई.
२६) निवड नस्ती- ऊर्जा-५